# सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयूट (स्टापी)

द्वारा आयोजित

## राज्यस्तरीय परिसंवाद अहवाल

## "महिला धोरण - २०१३" (मसुदा)

## महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन

दिनांक - ३०.०४.२०१३

STAPI

आयोजक


सोस्वा ट्रेनिंग ॲन्ड प्रमोशन इन्स्टिटयूट (स्टापी)
म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स ,पहिला मजला,
एम.एच.बी. कॉलनी येरवडा, पुणे - ४११००६

फोन नं. : ०२०-२६६८ ७९०० / २६६९ ६२१२ / २६६८२७१४,
फॅक्स नं. : ०२० - २६६९ ५६४६
ईमेल : stapi@vsnl.net / society_2007@dataone.in / stapipune@gmail.com
वेबसाईट : www.stapi.org

## Index of the Report


| Sr. No. | Topic | Page Nos. |
|---|---|---|
| 1 | Referance Page number Guide as per Marathi and English Verson of draft Women Policy | 3 - 4 |
| 2 | The Backgound and Introduction to State Level Consultation Meeting on Women Policy - 2013 (Draft) | 5 - 6 |
| | **PART - I** | 7 |
| 3 | General Comments on Policy as a Whole- Presentation | 7 - 10 |
| 4 | Women's Charter, Gender budget | 10 |
| 5 | Awareness and Sensitization / Participation and Involvement of Voluntary Organizations / Monitoring, Evaluation and Supervision | 10 - 12 |
| 6 | Education and Research | 12 - 13 |
| 7 | Hostels for Women, Health | 13 |
| 8 | Washroom Facilities (Toilets | 14 - 16 |
| 9 | Freedom from Addiction (De Addiction), Environment , Cultural policies | 17 |
| 10 | Women And Law | 18 - 23 |
| 11 | Freedom from Addiction (de addiction, Cultural Policies | 23 |
| 12 | Women and Industry | 25 |
| 13 | Political Empowerment of Women Representatives | 25 |
| 14 | Role of Women in Agriculture, Rural, Urban and Tribal Sector / Water Supply | 26 |
| 15 | Women Working in Unorganized Sector, Physically Disabled and Mentally Chellanged Women, Single Women | 26 - 27 |
| 16 | Folk Artists in Social Awareness (Ballad/Shahiri) | 28 |
| 17 | Rehablitation of Devdasies | 28 |
| 18 | Sexually Exploited Women, Transgender, Awards for Women's For Their Contribution in various Fields | 28 - 29 |
| 19 | Transgender, Awards for Womens For Their Contribution in various Fields | 29 |
| 20 | A Brief Overview of Interactive Discussions | 30 - 31 |
| | **PART –II** | |
| 21 | About the Questionnaire | 32 |
| 22 | Questionnaire Analysis | 32 - 40 |
| 23 | Annexure - I Feedback cum Follow up form Format. | 41 - 44 |
| 24 | Annexure - II day to day of the Stet Level Consultation Meeting on Women Policy 2013 (draft) | 45 - 48 |
| 25 | Annexure - III Media Coverage of State Level Consultation meeting on Women Policy 2013 (Draft) | 49 - 50 |
| 26 | Highlights of the Day | 51 - 52 |

**Women Policy 2013 (Draft)**

**Referance Page number Guide as per Marathi and English Verson of draft policy**


| Sr No | Topic | Page No. (English) | Topic (Marathi) | Page No. (Marathi) |
|---|---|---|---|---|
| 1 | Background | 2- 4 | पार्श्वभूमी | 3 - 5 |
| 2 | Preface | 5 - 7 | प्रस्तावना | 6 - 7 |
| 3 | Women's Charter | 8 | महिलांसाठी सनद | 8 |
| 4 | Gender Budget | 9 - 11 | जेंडर बजेट | 9-10 |
| 5 | Awareness/Participation by NGOs/Monitoring & Supervision/Scope and Limitations | 12 - 17 | जाणीव-जागृती/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग/ संनियंत्रण व पर्यवेक्षण | 11-14 |
| 6 | Education and Research | 18 - 22 | शिक्षण व संशोधन | 15-18 |
| 7 | Hostels for Women | 23 | महिला वसतीगृह | 19 |
| 8 | Crèche | 24 | पाळणाघर | 20 |
| 9 | Health | 25 - 27 | आरोग्य | 21-22 |
| 10 | Wash Rooms facilities (toilets) | 28 | प्रसाधन गृह सुविधा | 23 |
| 11 | Freedom from Addiction (De-Addiction) | 29 | व्यसनमुक्ती | 24 |
| 12 | Environment | 30 - 31 | पर्यावरण | 25-26 |
| 13 | Cultural Policies | 32 - 33 | सांस्कृतिक धोरण | 27 |
| 14 | Women and Industry | 34 | महिला व उद्योग | 28 |
| 15 | Women and Law | 35 - 54 | महिला आणि कायदा | 29-40 |
| 16 | Political Empowerment of Women Representatives | 55 - 56 | महिला लोक प्रतिनिधीचे राजकीय सक्षमीकरण | 41-42 |
| 17 | Role of Women in Rural, Agricultural, Urban and Adivasi areas in Water Supply | 57 - 73 | कृषी,ग्रामीण ,शहरी व आदिवासी क्षेत्रातील महिलांची भुमिका/पाणी पुरवठा | 43-52 |
| 18 | Women Working in Unorganized Sector | 74 - 77 | असंघटित कामगार महिला | 53-55 |
| 19 | Physically Disabled and Mentally Challenged Women | 78 - 79 | अपंग व मतिमंद महिला | 56 |
| 20 | Single Women | 80 - 82 | एकल महिला | 57-58 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21 | Folk Artists in Social Awareness (Ballad/Shahiri) | 83 - 84 | प्रबोधनात्मक लोक कलावंत (शाहिरी) | 59 |
| 22 | Rehabilitation of Devadasis | 85 - 87 | देवदासी पुनर्वसन | 60-61 |
| 23 | Sexually Exploited Women | 88 - 93 | लैंगिक शोषण झालेल्या महिलांसाठी | 62-65 |
| 24 | Transgender | 94 - 98 | तृतियपंथी व्यक्तींकरिता | 66-69 |
| 25 | Awards to Women for their contribution in various fields | 99 | इतर | 70 |

**The Backgound and Introduction to State level Consultation meeting on Women Policy - 2013 (Draft) organized by STAPI at Pune on 30 April 2013.**

Maharashtra had realized the importance of women's empowerment in the development of the country and taken important steps in the direction by introducing the Women's Bill in 1994. Realizing that welfare programmes and schemes were not enough, and that women's participation in the process of decision-making was essential for their empowerment, the Government, considering the changing circumstances, declared the Women's Policy II in 2001.

It seems that the changing time and social circumstances are posing greater challenges to women. The recent incidents of violence against women have prompted the need to give a serious thought to women's safety. Strict laws are not the only solution tothis problem. It is the need of the hour to change the mindset of people so that women are respected in the society.

Twelve years have passed since the women's policy II was introduced. Many changes have taken place even since in the mental makeup of the society as well as in social one. In order to declare a policy that is in tune with these changes, a committee to Draft the new policy has been established which consists of social workers and women organizations. The committee is guided by the Chief Minister, Hon'ble Shri PrithvirajChavan and the Dy. Chief Minister, Hon'ble Shri Ajit Pawar. The active participation ofHon'ble Prof. Varshatai Gaikwad, Cabinet Minister for Women and Child Welfare, Hon'bleSmt. Fauziya Khan, State Minister of Women and Child Welfare and Hon'ble Shri Ujwal Uke,Chief Secretary, Women and Child Welfare has been of immense value in finalizing theDraft. We are sure that the suggestions and recommendations of the experts from many different fields will be of great value. However, society's support to the department of Women and Child Welfare is vital to the successful implementation of the policy.

Sosva Training and Promotion Institute (STAPI): A State level Counsultation Meeting on Tuesday, 30 April 2013 on Women Policy- 2013(Draft) at Pune between 11.00 A.M. - 6.00 P.M.

Sosva Training And Promotion Institute (STAPI) , a support service organization organized a State Level Consultation Meeting on "Women Policy – 2013" (Draft) at STAPI on 30/4/2013. Parinita Kanitkar Chief Executive STAPI welcomed the delegates and explained in brief STAPI's activities. Dr. Malati Anagol Trustee, STAPI explained the role of STAPI in organizing the state level consultation meeting. Prof Sadhana Zadbuke Director Samvedana gave a brief background of the "Women Policy – 2013" (Draft)

Dr. Neelam Gorhe Founder president, Stree Adhar Kendra delivered the key note address and also moderated a session in which following sessions/ sections of the witch "Women Policy – 2013" (Draft) were discussed at length. Speaking on the occasion, Dr. Neelam Gorhe Founder President , Stree Adhar Kendra felt that there are still gaps in the proposed draft and there is a need for the representatives of the Voluntary organizations/ Experts and the Concerned Government Representatives to work together for the refinement of the proposed "Women Policy – 2013" (Draft).

The various sessions taking into account various aspects/ sections of the “Women Policy – 2013” (Draft) were moderated by eminent persons like Hon. Smt. Shobhana Ranade Trustee Secretary Gandhi National Memorial Society Pune ; Hon. Smt. Meena Kurlekar Executive Director Vanchit Vikas , Pune ; Hon. Mr. Ashok Dhivare Joint Commissioner (Retd.) (Law and Order), Pune; Hon.Prof. Sadhana Zadbuke, Director, Samvedana, Kolhapur; Hon.Dr.Vaijayanti Patwardhan Consultant (Medical), NRHM (RCH II) KEM Hospital and Research Center, Pune; Hon.Ms. Anu Swamy - President Kranti Mahila Sanstha Mumbai; Hon. Vasavi Chilka President, Astha Parivar, Mumbai

The Conference had distinguished delegates from the sector and was attended by 54 delegates from 7 districts representing NGO representatives; Experts and Representatives from Government Organizations.

This State Level Consultation Meeting on Women Policy – 2013(Draft) was an effort to understand and invite valuable comments and the feedback from the sector specialists to make “Women Policy – 2013” more integrated and comprehensive. Sosva Training and Promotion Institute will submit a Consolidate Report of State Level Consultation Meeting on Women Policy – 2013(Draft) to the Government of Maharashtra.

## PART - I

## General Comments on Policy as a Whole- Presentation

**1) Prof. Smt. Suma Chitnis- Former Vice Chancellor S.N.D.T University, Mumbai**

- The document is very comprehensive. What we need a realistic statement. In this document it is mentioned that everything that everything that we can do and that is good. But it should be ritualistic or a plan?? If it is a plan than there should be some preamble to what happened to the past promises. How much we have achieved? The kind of experience of past, clear thinking, analysis of what have been done?? It is just a mechanical document talking about what can be done for women. It is very insulting to me. It convinces that we are weaker women.
- The whole document talks about "Women welfare". Whole thing is treated as a matter of women welfare (women as a weaker section)? When we realize this??
- This is not a matter of Welfare. The country planner people should recognize that looking after the citizens need, is the responsibility of STATE.
- According to her this report is one more new creation which is not talking about current situation, the average of family life to name few. The document should talk about basic issues like issues of single women staying alone?? Why we talk only about poor?? Why we only thinking of helping poor?? There should be a separate "cell" for society and whatever things are happening in society, should be controlled by this cell.
- If the Government is handling the issue, then society should ask few questions like what has happened, whether it is implemented or not, what is the progress / status of development??
- There is always a confusion between poverty and disadvantageous situation. However many rich and middleclass men and women also need (support/help). So document like this should realize that the support is needed for women and men also (for ex : Dignity foundation who care elderly people

1. The society is very talented. Elderly people (poor and rich) need support or people should reach to them to offer help.
2. Are we sill "Abala's" when we will be "Sabla's"
3. Will the society would develop if we concentrate only on poverty?
4. Why still we are talking of welfare since providing welfare is the constitution commitment.

---

**2) Dr.Alka Vyas (FESCOM) Pune 411008**

- Women are not competing with men but they are trying to know their limits.
- Senior women have lot many problem and should be considered independently.

---

**3) मा. यामिनी चौधरी- विदर्भ महिला दिन संयोजन समिती, नागपूर - १५**

- *महिला सक्षमीकरण एवढा संकुचित क्षेत्र वाढवणे ही काळाची गरज आहे.सामाजिक न्यायाची स्थिती येण्यासाठी व सक्षम व न्याय समाज निर्मीतीसाठी धोरणाचा उद्देश अठरा ते विस वर्षानंतर व्यापक होण्याची गरज आहे.एकटी स्त्री सक्षम झाली तरी '' सावित्री घरोघरी हरवलेल्या ज्योतीबाचा शोध करी'' या सामाजिक विरोधाभासात ती फसलेली आहे म्हणून हक्काचा, अधिकाराचा उपयोग घेतांना तिच्यावरील वाढत्या कौटुंबिक व सामाजिक हिंसाचाराचा बळी व्हावे लागले '' महिला धोरण समाजिक न्यायासाठी व सक्षम व न्याय समाजनिर्मितीसाठी '' हा मुख्य उद्देश असावा.*

---

**4) Shaila Suhas Limaye, Majhi Maitrin Charitable Trust ,Pune**

- Time limit for each activity should be compulsory.

---

**5) Dr.Vijayalaxmi Taskar, President Streehitkarini, Mumbai - 400 025**

- List of recommendations and programs achieved during earlier 'Mahila Dhorans' so we will know from where to proceed and what to achieve.
- The unspent allocation of each department for womens programs should be declared every quarter and the concerned authorities should be held responsible for default
- The schemes of each department should be widely publicized and their achievements should be made known and non achievements should be questioned.

---

**६) श्रीमती. विद्युत भागवत, माजी संचालक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महीला अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ**

- *सदर महिला धोरण स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्याचा प्रयत्न करत आहे हे अभिनंदनीय आहे. समाजाचा एक परिपूर्ण आणि समान घटक म्हणून स्त्रियांना समान स्थान प्राप्त व्हावे ह्यासाठी महाराष्ट्र सरकार जे प्रयत्न करत आहे ते महत्त्वाचेच आहेत. आजघडीला खुली अर्थव्यवस्था, राज्यसंस्थेचे बदलते स्वरूप, बाजारपेठेचे वर्चस्व, वाढती आर्थिक विषमता, तसेच वाढत्या प्रमाणावर अस्मितांचा संघर्ष आणि अल्पसंख्याक गटांमध्ये पसरणारा मूलतत्ववाद हे मुद्दे लक्षात घेतले तर, स्त्रियांच्या विरूद्ध होणारा हिंसाचार तसेच, समानता ह्या तत्त्वाचा प्रत्यक्ष व्यवहारात सोयीने केला गेलेला वापर आणि त्यातून स्त्रियांच्या गटामध्ये पडणारी फूट ह्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. गर्भावस्थेतच होणारे स्त्री जीवनावरील हल्ले पाहता स्त्रीप्रश्न हा जात, वर्ग, धर्म ह्या प्रश्नांसोबतच बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये घडविला जातो आहे हे लक्षात घेणे जरूरीचे वाटच, केवळ पुरूषप्रधानता ही मानसिकता आहे आणि ती बदलता येऊ शकते अशा भाबड्या उद्दिष्टावर आधारीत आताचे धोरण असू नये असे सुचवावेसे वाटते. अनेक सूचना कराव्याशा वाटतात. काही बदल तात्काळ करता येतात, काही बदल दीर्घ काळामध्येच होणार असतात परंतु तरीसुद्धा तशी इच्छा आणि दिशा असणे महत्त्वाचे आहे.*

---

**७) श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे**

- *पहिल्या दोन धोरणांचे फलीत काय?* **(Achievement?)**
- *स्त्रीभ्रुणहत्येचे वाढते प्रमाण, स्त्रीयांवर होणारे वाढते अन्याय, अत्याचार हे जर थांबले नाहीत तर एकंदरीतच मनुष्य प्राणी या जगातून हद्दपार होणार आहे. जगत जननीच नष्ट झाली तर जग वाचेल व कसे? जगच नष्ट होण्याचे भिती आज निर्माण*

*झाली आहे. हे सगळे आता कायमचे थांबले पाहिजे प्रत्येक स्त्रीजन्माचे स्वागत झाले पाहिजे. प्रत्येक स्त्रीला प्रतिष्ठा, सन्मान, प्रेम मिळाले पाहिजे. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहिले पाहिजे.*

---

***८) डॉ. सुधा कांकरिया, स्त्री जन्माचे स्वागत करा, चळवळीच्या प्रणेत्या, अहमदनगर – ४१४००१***

- *मागील दोन धोरणाप्रमाणे या ही धोरण मसुद्यामध्ये अनेक आदर्श सूचना केलेल्या दिसतात. मागील अनुभव पाहता याला कृती कार्याक्रमाची जोड देणे आवश्यक आहे. धोरण कागदावरन राहता वास्तवात येण्यासाठी काल निहाय ट्प्पे* (time bound implementation programme) *आखावी. याही धोरणात 'असे करावे''असे केले जाईल' अशी भाषा वापरली आहे. मग प्रश्न निर्माण होतात, की '' असे करण्यापासून सरकारला कोणी रोखले आहे का?'' सरकार कशाची वाट पाहते आहे? की फक्त महिला धोरण जाहीर करण्यातच धन्यता मानायची? केवळ पुरोगामी राज्य असल्याचा आव आणायचा?*

---

***९) मा. शालिनी बापट, अध्यक्ष, भारतीय स्त्री शक्ति जागरण, पुणे – ४११०३०.***

- *महिला विषयात अर्थ, नियोजन, पर्यावरण, सांस्कृतिक, शिक्षण अशी सर्वच खाती समाविष्ट आहेत. विविध खात्यांमधील धोरण, अंमलबजावणी, आर्थिक तरतूद, आढावा इ. विविध पातळयांवर सुसूत्रीकरण करण्याची गरज लक्षात घेऊन यासाठी स्वतंत्र 'अंमलबजावणी संचालनालय' स्थापन करावे.*
- *महिला धोरण व शासनाची अर्थ, व्यवसाय, सामाजिक न्याय इ. धोरणाचा समन्वय असावा. त्यातील परस्पर विरोध काढून टाकावा. तसेच महिला धोरणाला पूरक आर्थिक तरतूद, कायदे व अंमलबजावणी यांची जोड असावी. संबंधित विभागानी आवश्यक अध्यादेश काढावेत व आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याची तरतूद असावी.*
- *मागील दोन धोरणाचा अंमलबजावणी आढावा घ्यावा. कोणत्या पायरी पर्यंत लक्ष्य साध्य झाले याचा लेखा जोखा जाहीर करावा.*
- *या धोरणामध्ये सक्षम स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविला जाईल असे म्हटले आहे. धोरणाचे लक्ष्य गाठण्यासाठी टप्पे ठरवावे. उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांबरोबर सहकार्य व भागीदारीची योजना आखावी. अशा संस्थांनी कुठे संपर्क करावा या बद्दल माहिती धोरणामध्ये, वेब साईटवर दयावी.*
- *पुरुष जागृती कमी झाल्याचा उल्लेख आहे. त्याला कृती कार्यक्रमाची जोड असावी. भारतीय स्त्री शक्ति स्थापनेपासूनच असे मानते कि, स्त्रियांचे प्रश्न फक्त स्त्रियांचे नसून संपूर्ण समाजाचे आहेत व त्यांची सोडवणूक स्त्री-पुरुष सर्वांनी करण्याबद्दल कामही करत आहे.*

---

***१०) श्री. अशोक लाखे, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कोल्हाटी / डोंबारी समाज सेवा संघ, कोल्हापुर.***

- *धोरण व अंमलबजावणी मध्ये पारदर्शकता असावी. त्यात गावपातळी पासून स्वयंसेवी संस्थांचा सहभाग (प्रशिक्षण, संवेदनशीलता वाढविणे व अंमलबजावणी वर लक्ष ठेवणे) घ्यावा. या कामासाठी त्यांना सक्षम करावे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कोल्हाटी /डोंबारी समाज हा कला क्षेत्रांशी निगडीत असल्याने समाजातील लोक हे ८० % कलावंत आहेत.*

---

**11) Hon. Smt. Sujata Manohar, Former Judge, Supreme Court of India**

- **The 6th aim at page 7** should emphasize elimination of harmful customs like dowry and child marriages.
- **4 & 7 is to the Convention** on Elimination of All Forms of Discrimination against Women. This is an International Convention of U.N. to which India is a signatory. It is not a Committee. There is a CEDAW Committee which works for the enforcement of CEDAW.

---

*१२) डॉ. कल्याणी मांडके , सामाजिक कार्यकर्त्या (अपंग व कर्णबधिर), पुणे*

- *प्रस्तावने मध्ये पुढील उल्लेख असावा : महाराष्ट्र राज्य जिथे महिलांना सर्व स्तरावर सन्मानाने वागविले जाते आणि ज्या राज्यात महिलांना जगण्याचा समृध्द अनुभव घेता येतो असे भय मुक्त राज्य होईल असा विश्वास वाटतो.*

- *धोरणाच्या मध्ये पुन्हा एकदा वरील मुद्याचा उल्लेख असावा - जगण्याचा समृध्द आणि भय मुक्त अनुभव घेण्याजोगे निकोप वातावरण तयार करणे. तसेच अपंगत्व असलेल्या महिला आणि मुली यांना समान संधी, सन्मान पूर्वक वागणूक मिळणे ह्याचा हि उल्लेख असावा उद्दिष्टामध्ये उल्लेख असला कि तो विचार प्रभावीपणे पुढे जावू शकतो. अन्यथा नाही*

**Sr No. 3 Women's Charter Eng - Page No. 8 Mar- Page No. 8**

*१) श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी - ४१५६०५*

- *महिलांसाठीची सनद याबद्दल फारशी स्पष्टता नाही त्यामध्ये नेमकेपणा यावा*

**Sr No. 4 Gender budget E - Page No.9-11 M- Page No. 9-10**

*१) श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी - ४१५६०५*

- *१० % निधी जेंडर बजेटसाठी वापरण्यात यावा*
- *जेंडर बजेटसाठी संकल्पना स्पष्टता धोरणात नोंद असावी १०%, २०% निधी का? सर्व समावेशक विविध समित्या, विभागामध्ये हा विषय समन्वयाने या विषयावर विचार आवश्यक याचसोबत निधीच्या विनियोगाचे स्पष्ट उल्लेख असावेत.*

**Sr No. 5 Awareness and Sensitization / Participation and Involvement of Voluntary Organizations / Monitoring, Evaluation and Supervision**

**E - Page No. 12-17 M- Page No. 11-14**

**1) Shaila Suhas Limaye, President, Majhi Maitrin Charitable Trust, Pune**

- Sex education /advocacy to younger generation especially boys is essential (awareness programmes for gents is most important )

---

*२) श्रीमती. अंजली आत्रे, कार्यक्रम अधिकारी, आंतरराष्ट्रीय दिर्घावास केंद्र - भारत, पुणे - ४११०३०*

पुरुषांची मानसिकता बदलण्याची गरज आहे समाजातल्या कुठल्याही स्तरात आज आपल्याला स्त्रियान विषयी दुय्यम स्थान ,सेवे साठी , तसेच उपभोग्य वस्तू आशयाच प्रकारचे दृष्टीकोन कमी जास्त प्रमाणात अनुभवास येतात . ते बदलणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी लहानपणा पासून शाळां मधून संस्कार घडवणे आवश्यक आहे,कारण संस्कार हे जरी घरातून घडत असले तरी प्रत्येकाच्या घरची परिस्थिती वेगवेगळी असते, त्यामुळे चुकीचे संस्कार घडू शकतात. म्हणून शाळा हे योग्य संस्कार घडवण्याचे मध्यम व्हावे व चांगला समाज घडवण्याचे योग्य स्थान असवे. सुसंस्कारित समाजातच महिलां विषयीचे लैगिक गुन्हे घडण्यावर आळा बसू शकतो . यासाठी शाळां मधून जशी रोज 'भारत माझा देश आहे' हि प्रतिज्ञा म्हणून घेतली जाते तशीच

पुढील प्रतिज्ञा मुलग्या न कडून म्हणून घेतली जावी ......।

**प्रतिज्ञा**

स्त्री हि परमेश्वर स्वरूप आहे. ती माझी जन्म दात्री आहे.

माता ,भगिनी ,पत्नी ,मुलगी,सून हि स्त्रीची विविध रूपे मी माझ्या आयुष्यात नेहमीच अनुभविन ,

स्त्री मुळे माझ्या जीवनाला आणि समाज्याला आधार आहे,आकार आहे.

तिच्य शिवाय समाज आणि माझे आयुष्य निरर्थक आहे.

तिच्या कडून मिळणारे संस्कार, माया , धीर,आधार या मुळे माझ्या जीवनास अर्थ निर्माण होतो .

त्यामुळे मी सुसंस्कारित व चारित्र्यवान होतो. या गोष्टीची मी सतत जाणीव ठेवीन ......

ती कोण त्याही रुपात अथवा नात्यात असो तिचा मी कायम आदर करीन ...

माझ्या हातून तिचा अपमान होईल,अन्याय होईल असे पातकी वर्तन मी कधीही करणार नाही .

आणि इतरान कडूनही कधीही होऊ देणार नाही . आश्या प्रकारचे वर्तन हे मी महा पाप समजतो ...

या शिवाय मी माझ्या संपूर्ण आयुष्यात तिला सन्मानाने व आदराने वागवीन.

ती माझ्या पत्नीच्या रुपात असताना समानतेची वागणूक देईन ,

माझ्या मुलांच्या संगोपनाची व संसाराची जबाबदारी मी बरोबरीने घेईन ,

घरातली कामे करण्यास मला कोणताही कमी पण वाटणार नाही .

माझी आई ,बहिण, पत्नी, मुलगी,सून यांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगती मध्ये मी माझी प्रगती व प्रतिष्ठा मानीन .

माझा आस विश्वास आहे की माझ्या आयुष्यात स्त्री विविध रूपाने मानसिक आधार देत राहते, ती मला परमेश्वर सम आहे.

---

**3) Mukta Puntambekar, Deputy Director, Muktangan Mitra, Pune, India**

- Awareness about ill-effects of addiction among women

---

***४) श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी - ४१५६०५***

- *प्रौढ कुमारी माता - कोणत्याही मुद्यांचे वास्तव - सद्यस्थिती व अपेक्षित बदल - सूचना यांची कलमात स्पष्टता नाही.*
- *विद्यार्थीनी कक्षाद्वारे जाणीवजागृती पण विद्यार्थीनी सोबत काम आवश्यक त्याबद्दल स्पष्ट धोरण हवे.*
- *क्रिडाक्षेत्रातील दक्षता समितीचेही लिंगसमभाव विषयक प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.*

---

***५) डॉ. आरती नगरकर, सहाय्यक प्राध्यापक, आरोग्य विभाग, पुणे विध्यापीठ,पुणे - ४११००७***

***मुद्दा.क्र २ : संस्कारक्षम पिढी बनविणे*** *- ह्या मुद्यामध्ये '' मुल्य शिक्षण'' चा अभ्यासक्रम विकसित करुन इयत्ता ४ थी पासून ८-९ वी इयत्तेपर्यत शिकविला जावा. सुरवातीला समानता ,मैत्री ,बंधुता , घरात अथवा समाजामध्ये कसे वागावे हे शिकविले जावे. ६ व ७ वी मध्ये जातीभेद,लिंगभेद वयानुसार होणारा भेद, प्रेम, मैत्री, जिव्हाळा, गरज ह्यामधील फरक व व्यवहारतील महत्व व ८ वी व ९ वी*

*मध्ये लैंगिक शिक्षण, स्त्री - पुरुष समानता , नितीमत्ता संयम ,आदर इत्यादी मुल्यांचा अभ्यासक्रमात समावेश करावा .त्याबरोबरच मानवी हक्क म्हणजे काय ? ते कोणते आहेत इत्यादीची माहिती असावी.*

***मुद्दा क्रं.५:*** *महिलांसाठी धोरण ,हक्क कायदे इत्यादी विषयांची माहिती प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामपंचायती व पंचायत समितीचा मोठा सहभाग असावा. किंबहुना ह्यामधील महिलांना (कमीत कमी २ सदस्य)यांना ह्या विषयाचे प्रशिक्षण निवडणूक झाल्यावर लगेच दिले गेले पाहिजे.तशी तरतूद मसुद्यामध्ये असावी.*

---

***६) श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

*१) नागरीक शास्त्राप्रमाणे* Moral Education *ह्या विषयाचा समावेश करावा.*
*२) या अगोदर शाळेतील पुस्तकांतील धडे शिकवले गेले नाहीत. आता वेगळे काय होणार?*
*३) अश्लिलतेचे काय? - मॉडेल, नटघा, नट, कपडे /वागणे व त्यांचे प्रदर्शन यावर बंधने असायला हवी.*
*४) शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील महिलांचे हक्क, महिल धोरण व महिलांविषयक कायदे प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविले पाहिजे.*

---

***७) डॉ. कल्याणी मांडके , सामाजिक कार्यकर्त्या (अपंग व कर्णबधिर), पुणे***

- *जाणीव जागृती - संस्कारक्षम पिढी घडविणे - प्रत्येक व्यक्तीस माणूस म्हणून आदराने आणि सन्मानने वागविले पाहिजे. माणूस प्रथम आणि स्त्री, पुरुष, मुलगा - मुलगी हा भेद नंतर हा विचार मुल्य शिक्षणामध्ये ठसविला गेला पाहिजे.*

**Sr No. 6 Education and Research Eng - Page No. 18-22 Mar- Page No. 15-18**

***१) श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी - ४१५६०५***

- *शिक्षण - संशोधन :- शैक्षणिक प्रवेशासाठी महिलांना वयोमर्यादेचे बंधन नाही म्हणजे वया संदर्भात काहीही स्पष्टता नाही. वाढीव संशोधन कालावधीचीही स्पष्टता आवश्यक.*
- *जीवनकौशल्य विषय व लिंगसमभाव विषयक अभ्यासक्रम स्वतंत्र ठेवू नये. शिक्षणात हे मुद्दे परस्परपूरक म्हणून एकत्रित विचार करावा.*
- *मुलीचे शिक्षण १२ वी पर्यंत नव्हे तर पदवीपर्यंत मोफत मिळावे.*
- *पाठ्यपुस्तकामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा धडा / कविता असणे आवश्यक आहे.*

---

***२) डॉ. सुधा कांकरिया, स्त्री जन्माचे स्वागत करा, चळवळीच्या प्रणेत्या, अहमदनगर - ४१४००१***

- *अनिष्ट रुढी परंपराची फेर मांडणी करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. हुंड्याची पध्दती, मुलगा हवा हाच अट्टाहास, वंशाचा दिवा म्हणजे मुलगाच वगैरे घातक रुढी परंपरा बंद करुन संक्रातीचा गोडवा, दीपावलीचा तेजोत्सव, दसऱ्याची यशोगाथा सांगताना वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरणाविषयी आपुलकी ठेऊन डोळस श्रध्दा जपली जावी यासाठी प्रयत्न करावेत.*

---

3) ***मा. शालिनी बापट, अध्यक्ष, भारतीय स्त्री शक्ती जागरण, पुणे - ४११०३०.***

- *लैंगिक शिक्षण व लिंग भाव समानता हे दोन वेगळे व आवश्यक मुद्दे आहेत.*

---

**4) Hon. Smt Sujata Manohar, Former Judge, Supreme Court of India**

- The proposal at page 15 for evening schools or night schools for women is not a good idea, looking to the current safety situation. -
- Cycles should be provided to young girls who have to travel long distances to attend High School.

---

***५) श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

- Moral Education - Subject add *करायला पाहिजे.*
- *सुरक्षेची व्यवस्था करताना दिव्याची सोय / वीजेची उपलब्धता केली पाहिजे.*
- *१००% साक्षरता हे उद्दिष्ट असावे ( कागदोपत्री नसावे)*
- *पाण्याची व्यवस्था सक्तीची असली पाहिजे.*
- *सामाजिक व्यक्तिंना दुरुस्तीचे प्रशिक्षण बोअर टाकण्याची सोय/ तरतूद*
- *स्वच्छतागृह नाही म्हणून मुली शाळेत जात नाहीत*
- *पास/बस व्यवस्था*
- *जवळची शाळा -* Local Travel, *बैलगाडी, ट्रॉली (ट्रॅक्टर) वगैरेची गावाकडून सोय केली पाहिजे.*
- *स्वसुरक्षेसाठी (स्वसंरक्षणार्थ) अंर्तभवा करण्यासाठी कराटे प्रशिक्षण दिले पाहिजे.*
- *ग्रामीण भागात या विषयासाठी शिक्षक नसतात तर भाषा कौशल्य संवाद कसे शक्य आहे?*

---

***६) डॉ. कल्याणी मांडके , सामाजिक कार्यकर्त्या (अपंग व कर्णबधिर), पुणे***

- *अपंगत्व असलेल्या मुलींना शिक्षणाच्या संधी, तसेच संशोधन कार्यक्रम राबविण्यासाठी अपंग व्यक्तींना योग्य त्या सुविधा पुरविणे बंधनकारक राहील (*Reasonable Accommodation)

*१) शिक्षणाचा अधिकार २०१० प्रभावी अंमलबजावणी मध्ये अपंगत्व असलेल्या मुली आणि महिलांना समान संधी दिली जाईल.*

| Sr No. 7 | Hostels for Women | Eng - Page No. 23 | Mar- Page No. 19 |
|---|---|---|---|

***१) श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

- *महिला वस्ती गृहामध्ये मोफत सुरक्षेची व्यवस्था असायला पाहिजे.*
- *सर्व महिला वस्ती गृहामध्ये असलेल्या मुली आणि महिलां करिता ३ % आरक्षण असेल, वस्तीगृहामध्ये अड्थळा विरहित वातावरण निर्माण केले जाईल* (Barrier Free Environment)

| | | | |
|---|---|---|---|
| **Sr No. 9** | **Health** | **Eng - Page No.25 - 27** | **Mar - Page No. 21 - 22** |

***१) मा.श्रीमती.सुहासताई कोल्हेकर, अध्यक्ष, नॅशनल अलायंस फॅार पिपल्स मुव्हमेंट, पुणे - ४११०३८***

- *आरोग्य: दुर्गम /आदिवाशी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतील महिला कर्मचायांची आरोग्य तपासणी व त्याप्रमाणे त्यांची नेमणूक; तसेच भाग्गोलिक परिस्थितीनुसार त्यांना वाहन व सुरक्षिततेची व्यवस्था आवश्यक( एम.पी.डब्ल्यू ने नर्सच्या सोबत गावभेटी करणे.)*
- *वन आधारीत जीवनशली असलेल्या समुहांचे ''आरोग्य सुध्दा सामुहिक वन हक्कावर अवलंबून असते त्यामुळे सर्व वनगावांना सामुहिक वनहक्क मिळावेत.*

---

**2) Shaila Suhas Limaye ,Majhi Maitrin Charitable Trust ,Pune**

- Maintenance and welfare of parents & senior citizens - CSR Funds should be utilized.

---

**3) Dr.Vijayalaxmi Taskar, President Streehitkarini, Mumbai - 400 025**

- Health Family planning and population problem has taken a back seat. PCPNDT act goes into overdrive to check female feticide, but women need USG for diagnostic reasons and even for technical record keeping mistakes doctors are taken to task.

---

*४)* ***श्रीमती. विद्युत भागवत, माजी संचालक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महीला अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.***

- *गरोदर अवस्था किंवा अपत्य संगोपन अशा क्षेत्रांमध्ये स्त्रियांना विशेष सहाय्य दिले पाहिजे आणि म्हणून त्यासाठी सरकारने पाळणा घरे, बालवाड्या, आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे तत्पर पद्धतीने चालविली पाहिजेत.*

---

**5) Dr. Mukta Puntambekar, Deputy Director, Muktangan Mitra, Pune - 411006**

- Counseling facilities for women and their family members

---

***६) श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी - ४१५६०५***

- *सॅनेटरी पॅडची उपलब्धी चांगला मुद्दा पण त्याचा वापर आणि वापरानंतरची विल्हेवाट याबद्दलचे* orientation *आवश्यक.*

---

***७) डॉ. आरती नगरकर, सहाय्यक प्राध्यापक, आरोग्य विभाग, पुणे विध्यापीठ,पुणे - ४११००७***

- *राज्यातील महिलांच्या आरोग्यासाठी विशेष महिला आरोग्य अभियान राबविण्यात येईल :*

*गावपातळीवर प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत महिला आरोग्याचे विविध कार्यक्रम राबविले जातात . त्याचाच एक भाग म्हणून तीन महिन्यातून एकदा प्रत्येक गावामध्ये महिला आरोग्य जाणीव जागृती शिबीर असेल, त्यामध्ये १३ च्या पुढील वयातील मुलीला व महिला तसेच वृध्द महिलांचे आरोग्य विषयक* FAQ *ची उत्तरे चित्रफित किंवा चित्ररुप पोस्टर्सच्या माध्यमातून दिली जावी..त्यावेळेस*

*उपस्थित आरोग्य सेविकांनी त्यांचे प्रश्न लिहुन घेऊन  त्यावरील उपचारांचा पाठपुरावा करावा . त्यावेळीस  जर महिला डॉक्टर उपस्थित असेल तर मासिकपाळीचे त्रास,जननसंस्थेचे  रोग, इन्फेक्शन्स त्यावर तपासणी व मोकळेपणाने चर्चा केली तर महिलांना त्याचा जास्त फायदा होईल कारण असे विषय पुरुष डॉक्टरकडे सुध्दा सामान्य स्त्रिया बोलत नाही.*

***आरोग्य पान क्र. २१***

- ***महिलांचा मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये समुपदेशन केंद्रे स्थापन केली जातील.***

*महिलाच्या मानसिक ताणतणावांचे व्यवस्थापन करण्यासाठी समुपदेशन केंद्रे गरजेची आहेत. परंतु त्याआधीची एक पायरी म्हणजे महिलांना कशामुळे ताण निर्माण होतो, त्या ताणाची लक्षणे काय आहेत. ताणाचे शरीरावर काय परिणाम होतात आणी म्हणून घरच्याघरी/आपल्या रोजच्या जीवनात आपण ताण-ताणवाचा कसा मुकाबला करायचा हे सर्व स्त्री व पुरुषांना जाणीव-जागृती मार्फत समजावून सांगी गरजेचे आहे. बऱ्याच वेळा पुरुष त्यांच्या ताण-तींवाचे हा त्यांची बायको मुलगी, आई, बहीण, इ. वर मारहाण शिवीगाळ करुन बाहेर काढतात त्यामुळे पुरुषांना पण ताण-तींवाची जाणीव व समुपदेशनाची गरज आहे.तसेच महिलांना अशा प्रसंगी कसे वागायचे हे समर्जी गरजेचे आहे. आणि म्हणुन जरी ही समुपदेशन केंद्रे विशेष करुन महिलांसाठी चालविली गेली असली तरी पुरुषांना त्यात सहभागी करुन घ्यावे.*

- *आरोग्य सेवेमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या (आशा, अंगींवाडी सेविका) सामाजिक जाणीव वृध्दिंगत करुन त्यांना सक्षम केले जाईल  -*

***शासकीय रुग्णालयात लैंगिक अत्याचाराच्या उपचारासाठी विशेष केंद्रे उभारली जातील या केंद्रामध्ये लैंगिक अत्याचारग्रस्त,ॲसिड हल्यात बळी पडलेल्या महिला, काटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांसाठी उपचार व समुपदेशनाची व्यवस्था केली जाईल.***

- *आरोग्य सेवेमध्ये काम करणाऱ्यांमध्ये सामाजिक जाणीव सक्षम करणे त्यामध्ये फक्त महिला आरोग्यसेविका न घेता आरोग्य सेवेमधील पुरुषांना सुध्दा सहभागी करुन घ्यावे.तसेच त्यांना काटुंबिक हिंसाचाराची लक्षणे (जखमा, मुकामार, मानसिक चिंता, तींव) हे ओळखण्याचे पण प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ह्या जखमा अुवा मुकामारावर उपचार करण्याबरोबरच जर तिला ईीर (कायदेविषयक) मदतीची गरज असेल तर कोठे संपर्क करावा ही माहिती प्राथमिक आरोग्य केंद्रात ठळक अक्षरात दर्शनी भागात लावावी.*

***मुद्दा क्र. १५ - किशोरवयीन मुलींसाठी ग्रोथ चार्ट ......व २६***

- *ही संकल्पना चांगली आहे परंतु संशोधनातुन हे सिध्द झाले आहे की रक्तक्षयाची सुरुवात ह्याच वयात होते व जवळ जवळ ६०-७० टक्हे  मुलींमध्ये रक्तक्षय आढळतो व तो कमी करण्यासाठी फक्त आयर्न व फोलीक ॲसिडच्या गोळ्या उपयोगी नाहीत तर त्यांना पाष्टिक नाष्टा (जेवण नाही, सकाळचा नाष्टा) मिळाला तर खुप फायदा होईल. तसेच शाळेत जाणाऱ्या शाळाबाह्य मुलींसाठी पण हा उपक्रम अतिशय गरजेचाआहे. त्यंची* vulnerability *जास्त आहे त्यांची लग्ने लवकर होतात त्यांना मातृत्व लवकर येऊ शकते. त्यांना प्रगतीच्या मार्गापासून वंचित रहावे लागते म्हणुन शाळाबाह्य मुलींच्या आरोग्यासाठी ठोस पावले उलणे गरजेचे आहे.*

---

**7) Dr.Vaijayanti Patwardhan, Consultant RCH/NRHM working at K.E.M.Hospital Research Centre, Pune**

Women's Health :

- Janani Suraksha Yojana benefits for All women & Not only for BPL enrolled women
- All financial support/incentives to be disbursed by RTGS methods only & Not to disburse thro' any person

- Safe transport for women working in shifts/irregular timings
- Budget for Research in women’s social & health issues to be increased.
- Crèche facility( even in shift duties) ,constructing & maintain clean toilets, mess/canteen facility- for women on priority basis
- Changes in School Curriculum - Inclusion of basic health education, sex education, gender issues ,in the school curriculum
- Compensation ie Financial Support to victims of Domestic violence / Sexual assaults, single women
- Increasing the IEC activities for women’s health issues & to improve quality of advertisements related to women’s health/gender issues.

---

***८) श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

- *पाण्याची सोय असणारी स्वच्छतागृह प्रत्येकी घरी असायला पाहिजे.*
- *शुध्द पाण्याची सोय केली पाहिजे.*
- Photo Therapy Central
- *सर्वच महिलांसाठी विशेष आरोग्य विमा राबविण्यात यावी.*
- T.B. *ॲनिमिया, डोळ्याचे आरोग्य, कुपोषण असलेल्या महिलांना वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी.*
- *प्रत्येक तालुकापातळीवर महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालयांची निर्मिती व्हावी.*
- *वृध्द , अपंग आजारपणात नर्सेस / दाई घरी सेवेसाठी सध्या दिवसांला ६००/- (३००+३००) हे सर्वांना परवडणारे नाही. (शासनाकडून काम करता येईल.* )
- *औषधी वनस्पतीची लागवड प्राधान्य देणे (घरगुती औषधे)*
- *महिलांसाठी प्रवासात वैद्यकीय सेवा (नवीन मुद्दा) रस्त्यावर ठराविक कि.मी. अंतरावर वस्तीजवळ वगैरे*
- *ग्रामीण भागात गावात परसबाग घरोघरी असली पाहिजे (ताजी फळ व भाज्या नियमित मिळतील)*
- *ॲनिमिया व कुपोषणमुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अंगींवाडी, प्राथमिक व जिल्हा आरोग्य केंद्रे या स्तरावर आयर्न, फॉलिक ॲसिडच्या फक्त गोळया देवून प्रश्न मिटत नाही तर त्यांचा आहार व ॲनिमियाची कारण शोधणे महत्वाचे आहे.*

| Sr No. 10 | Washroom Facilities (Toilets) | Eng - Page No. 28 | Mar- Page No. 23 |
|---|---|---|---|

**1) *श्रीमती. सुनिता गांधी, अध्यक्ष, संवाद संस्था , रत्नागिरी – ४१५६०५***

*स्वच्छतागृह संख्या १५० मुलींमागे २ ही संख्या अत्यंल्प, बाथरुमह संख्या १५० मुलींमागे ३ ही संख्या अत्यंल्प, अपुरी ही संख्या किमान २५ किंवा त्यापेक्षा अधिक हवी.*

*श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.*

- 
- *राज्यभरातील बस/रेल्वे स्थानके, बाजार, तीर्थक्षेत्रे, पर्यटन स्थळे, शाळा, महाविद्यालये, काम करण्याच्या जागा या ठिकाणे पुरेशी व स्वच्छ प्रस्साधनगृहे निर्माण करुन सोलर पॅनल व दिव्याची सोय केली पाहिजे.*
- *पाण्याचा अपव्यय होणार नाही ह्यांची काळजी घेतली पाहिजे. (उदा. नळ वाहणारे , पाईप गळणारे)*
- *अर्ा कि.मी. अंतरावर प्रसाधनगृहे असावी*
- *महामार्गात महिलांसाठी दर २५ कि.मी. मागे युनिट, पोलिस केंद्र,कॅन्टिन, प्रसाधानगृह, औषधे, आपदकालीन सेवा (मेडीकल) असावी.*

---

२) ***डॉ. कल्याणी मांडके , सामाजिक कार्यकर्त्या (अपंग व कर्णबधिर), पुणे***

- *स्वच्छता गृहामध्ये अपंगत्व असलेल्या मुली आणि महिलां आणि गर्भवती महिलांना योग्यत्या सुविधा उपलब्धा केल्या जातील (अडथळा विरहीत)*
- *प्रसाधनगृहे: सर्व प्रसाधन गृहामध्ये एक शौचालय, हात धुण्याची जागा, आणि पाणी पिण्याची सोय अपंगत्व असलेल्या महिलांचा विचार करुन केलेली असेल.*

**Sr No. 11 Freedom from Addiction (De Addiction) Eng - Page No. 29 Mar- Page No. 24**

१) ***श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

- *दारु विक्रिवर बंदी तसेच उत्पादन ही बंदी हवी*

---

2) **Dr.Vijayalaxmi Taskar, President Streehitkarini, Mumbai - 400 025**

- Addiction in male members of the family especially alcoholic has great repercussion on the family –physical violence /financial oppression.

**Sr No. 12 Environment Eng - Page No. 30 Mar- Page No. 25**

१) ***श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे.***

- *स्वस्त / टिकावू सोलार उपकरणाची सोय असावी.*
- *सोलारचा वापर करुन रस्त्यावर दिवे , गावात दिव्यांची सोय केली पाहिजे.*
- *अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतांचा वापर*
- *सामाजिक सामुहिक वनधिकार/ वनीकरण /वृक्ष लागवड/ जतन संवर्धन / स्थानिक झाडे*
- *पाणी शुध्दीकरण*
- *पाणी अडवा / जिरवा वगैरे गावातील सरपंच ग्राम पंचायत यांना ५ वर्षापर्यंत पाणी साठविण्यासंदर्भात प्रशिक्षण दिले पाहिजे.*
- *नद्या, नाले, पाणवडे स्वच्छ ठेवणे प्रदुषित न होऊ देणे*
- *पाण्यामध्ये फॅक्टरीतील कॅमिकल्स, मळी सोडणे वगैरे बंदी असावी.*

**Sr No. 13 Cultural policies Eng - Page No. 32 Mar- Page No. 27**

१) ***श्रीमती. हेमा भालेराव, सामाजिक कार्यकर्त्या, पुणे***

- *अंधश्रध्दा निर्मुलन*
- *कर्तबगार महिलांची उदाहरणे दिली पाहिजे.*
- *महिला उपभोगाची वस्तू नाही.*

***१) मा.श्रीमती.सुहासताई कोल्हेकर , अध्यक्ष, नॅशनल अलायंस फॉर पिपल्स मुव्हमेंट, पुणे - ४११०३८***

- *वन आधारीत जीवनशल्ली असलेल्या समुहांचे ''आरोग्य सुध्दा सामुहिक वन हक्कावर अवलंबून असते त्यामुळे सर्व वनगावांना सामुहिक वनहक्क मिळावेत.*
- *नवीन लहान बालकांच्या लैंगिक शोषणा विरुधात संरक्षणाचा कायदा २०१२ यांचे स्वागत विशेषत: ज्या संस्थेच्या परिसरांत ती घटना हिईल ,त्या संस्थेनी गुन्हयाची नोंद करणे ही त्यांच्यावर जबाबदारी टाकली आहे याचे विशेष स्वागत - कारण असे अनेक गुन्हे हे संस्थेत राहणाऱ्या बालकांवर अथवा त्यांच्यांशी '' मिलीभगत होउन घडतात.*
- *या कायद्यांचे नियम लवकरांत लवकर करुन ते बनवण्यात आपण लता भिसे , जया सागड अश्या लोकाच्या मार्गदर्शनात बनवावेत .*
- *पोलिसांकडून शाळांकध्ये हस्तक्षेप /दबाव केल्या जाऊ नये ; पालक अथवा महिला शिक्षक सोबत असल्याशिवाय बालकांना ( गुन्हा करणारी लहानच मुलगा असला तरी ) पोलिसठाण्यात नेण्यात धाक दाखवू नये.*
- *प्रत्येक शाळेत /वसतिगृहात /सुधारगृहात ' दक्षता' समित्या स्थापन करणे आवश्यक करण्यात यावे*
- A motherhood of very women should be considered till the age of 6th yrs of the child.
- *कोर्ट केसेस मधे प्राधान्य हवे ६ महिन्यात ते १ वर्षात निकाल देण्यात यावे.ज्येष्ठ महिला या कोर्टाच्या बाबतीत फार फार* Suffer *होतात. अर्थिक मानसिक बाद्धिक,शारिरीक,सामाजिक आणी कार्टुबिक हानी फार होते .अनेकदा मृत्यु येते तो अतिशय दयनिय असतो पण निकाल लागत नाही.*

---

**2) Dr.Alka Vyas, President,Women development Division, The Federation Of Senior Citizens' Organizations Of Maharashtra (FESCOM, Pune 41108**

- Property rights *मधे श्रेष्ठ महिलांचे नाव बधंनकारक करावे.*
- *नसर्गिक किवां मानवनिर्मीत आपत्ती मधे मदतीसाठी ज्येष्ठ महिलांना प्राधान्य*

---

**3) Smt. Shaila Suhas Limaye, Managing Trustee, Majhi Maitrin Charitable Trust, Pune**

- Prevention of Sexual or other harassment by law and punishment is essential.
- Mobile from 5th std should be compulsory (only for emergency help line after pressing one batten is essential .(for help of group SMS to parents and police station )special mobile should be desisted
- Nodal Officer-high post lady of organization (NGO) should be appointed instead of labor commissioner.
- Complaint committee based on justice Varma & vishakha guidlines should be strictly formed if not following heavy punishment for the establishment is essential.
- Percentage in CSR funds should be spent for these educational and rehabilitation, Advocacy programs through NGOs working in these fields

---

**4) Dr.Vijayalaxmi Taskar, President Streehitkarini, Mumbai - 400 025**

- Half-way- homes need to be established for women who face domestic violence for a stay of few days till the intensity of the situation calms down and other procedures can be pursued.
- PCPNDT act goes into overdrive to check female feticide, but women need to USG for various reasons and even for technical record keeping mistakes doctors are taken to task. Addition in male members of the family especially alcoholic has great repercussion on family on the family –physical violence /financial oppression.
- When families are keen on having sons in the urban areas because of SRA between builders and politics, a lot of cash and much better house in high rate buildings which have a high market value. The mother in whose name the houses are harassed to sale the house and if this happens they are then left to destitute. Awareness about her legal rights and making a will and having support of local NGO is necessary. In spite of having sons it is ultimately the daughter who care of them
- Sexual offences against young children both boys and girls and rise in gang rapes. Is it because of more reporting or a rise in socially sick minds and perverts .The reasons for this has to be looked into socio –economic and psychological angles.
- HIV status of the perpetrators of those offenses should be looked into

---

***५) श्रीमती. विद्युत भागवत, माजी संचालक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महीला अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.***

